# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २२७/२०२४

**अपिलार्थी, श्री.नितीन देशमुख**
००१, सावित्री आवास,
मोहनानंद नगर, मांजर्ली,
बदलापूर (प), जि.ठाणे ४२१ ५०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, मानिवली खु.,
ता.मुरबाड, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती कार्यालय मुरबाड,
ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१ ४०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.०६.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२३ | -- | २०.०६.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १२.०१.२०४ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.आनंद वामन मुरेकर, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, मुरबाड, ता.मुरबाड उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संतोष दामोदर उबाळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मानीवली खु., ता.मुरबाड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.२१.०४.२०२३ या कालावधीतील प्रतिवर्षी ऑडिट रिपोर्टच्या प्रति नमुना २७ लेखा परीक्षणातील आक्षेपाच्या पूर्ततेच्या मासिक विवरण नोंदवही नमुना ३० ग्रामपंचायत लेखा परीक्षण आक्षेप पूर्तता नोंदवही."*

सदर प्रकरणी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी सदरची माहिती अपिलार्थी यांना दि.१९.०१.२०२४ रोजी पुरविली आहे. सदर माहिती घेऊन ग्रामपंचायत कर्मचारी यांना अपिलार्थी यांच्या बदलापूर येथील कार्यालयात पाठविले होते. त्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतलेली आहे. ग्रामपंचायत कर्मचारी बदलापूर येथे पाठविण्याचे कारण लक्षात न आल्याने त्यांना त्याबाबत विचारले असता, सदर माहिती देण्यास उशिर झालेला असल्यामुळे, त्यांनी व्यक्तीश: माहिती घेऊन, कर्मचाऱ्याला पाठविले होते.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदरचे ग्रामपंचायत कर्मचारी अपिलार्थी यांच्या बदलापूर येथील कार्यालयात दि.१९.०४.२०२४ रोजी माहिती घेऊन, प्रत्यक्ष गेले होते का? तसेच त्यासाठी त्यांना ग्रामपंचायतीकडून प्रवास भत्ता देण्यात आला होता का? याबाबतची चौकशी करणे योग्य होईल. तसेच केलेल्या चौकशीचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदरचे ग्रामपंचायत कर्मचारी अपिलार्थी यांच्या बदलापूर येथील कार्यालयात दि.१९.०४.२०२४ रोजी माहिती घेऊन, प्रत्यक्ष गेले होते का? तसेच त्यासाठी त्यांना ग्रामपंचायतीकडून प्रवास भत्ता देण्यात आला होता का? याबाबतची चौकशी करावी. तसेच केलेल्या चौकशीचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून , २०२४ .

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ